तुझा चांदोबा, माझा चांदोबा



मराठी : अश्विनी बर्वे

जिथं मी राहते आणि जिथं तू राहतो,
त्या जागा खूप वेगळ्या आणि दूर आहेत.
इथं थंडी आहे, तिथं गरमी आहे.
इथं आम्ही तलावावर स्केटिंग करतो आहे.
तिथं तू आपल्या तलावात पोहतो आहे.
इथं तू आपली पुस्तकं वाचतो आहे.
इथं मला त्या पुस्तकांची आठवण येते आहे.
जी आपण मिळून वाचली होती.
आजी आणि नातू नेहमी बरोबर असू शकत नाही.
पण त्यांच्यामधले अंतर
एकच दिसणाऱ्या चांदोबामुळे कमी होते.

जिथं मी राहते तिथं खूप बर्फ पडतो. पहिले हिमकण, मग मूक, नरम, तुझ्या श्वासा इतके हलके.

एक,

दोन,

तीन.






जिथं तू राहतो
तिथं सूर्य खूप तापतो.
तू माझ्यापासून खूप दूर आहे.
तिथं झाडांवर पक्षी बसतात,
सावलीच्या आशेने.
तू ते मोजू शकतो.
चार,
पाच,
सहा.

जेव्हा तू छोटा होता, तेव्हा मी तुला भेटायला आले होते,
आणि तेव्हा आपण मिळून पुस्तकं वाचली होती.
सगळी पुस्तके.
एका नंतर एक सगळी.
तुला 'मालगाडी' चे पुस्तक सगळ्यात जास्त आवडे. खरंतर तर तू आपल्या जीवनात कधीही मालगाडी बघितली नव्हती.



आता तुला चंद्रा विषयीचे प्रत्येक पुस्तक आवडते. तुझे चंद्रावर प्रेम आहे.





जिथं मी राहते
तिथं तलाव बर्फाने झाकला आहे.
घसराळा,
चमकदार,
थंड.
जर तू इथं असता तर मी तुझा हात पकडला असता आणि तुझ्याबरोबर तलावावर स्केटिंग केलं असतं. आपल्या आसपासची हवा हिमकणामुळे दुधाळ असती आणि तू हसला असता.



जर मी तू राहतो तिथं असते,
तर आपण दोघं चमचमणाऱ्या
तलावात पोहायला गेलो असतो.
जिथंपक्ष्यांनी उडत येवून मासे पकडले
असते.
आपण दोघांनी पांढऱ्या
वाळूचे महाल बनवले असते
आणि माकडाच्या वरच्या छोट्या
छोट्या पिल्लांना दाखवला असता.
जे आपल्या
आईच्या पाठीवर बसलेले असतात.
कदाचित एखाद्याने तुझं केळं ओढून
नेलं असतं. ते बघून मी हसले असते.



जिथं तू राहतो तिथली कुत्री तुझ्यावर प्रेम करतात.
बोस्सी आणि वूप्स,
ते तुझ्याकडून सांडलेले खाणं खायला तत्पर असतात. आणि हसऱ्या चेहऱ्याचा म्हातारा टांगा सुद्धा.तो तुला आपल्या शरीरावर टिकू देतो आणि त्याचे केस सावरू देतो. आणि पापी घेवू देतो.तो तुला संकटापासून वाचवतो.



जेव्हा तू मला बघायला आला होता,तेव्हा माझे कुत्रे सुद्धा तुझ्यावर प्रेम करू लागले होते.त्यांनी प्रत्येक ठिकाणी तुझा पाठलाग केला. आता जेव्हा ते माझ्या बरोबर डोंगराच्या रस्त्याने चालतात, तेव्हा त्यांचे नाक जमिनीवर शिकारीचा शोध घेते. आणि त्याच बरोबर ससा आणि हरिण सुद्धा. पण ते तुझा सुद्धा शोध घेतात. कारण त्यांना तुझी खूप आठवण येते.

जिथं मी राहते तिथं सकाळी डोंगराच्या वरून सूर्य उगवतो. एक चमकदार लाल चेंडू सारखा. तो बघता बघता पिवळ्या रंगाचा होतो.





तुझ्या इथल्या डोंगरावर, तलावावर संध्याकाळचा सूर्यास्त आकाश आणि पाणी रंगवतो. तो तुझ्या कुत्र्याला, आई आणि बाबांना सुद्धा

लाल, गुलाबी आणि नारंगी रंगाने रंगवतो. आणि मग तू आपल्या चंद्राकडे बघतो.



जिथं मी राहते तिथं आम्ही दुलई पांघरून झोपतो. आणि खूप थंडी पडली की लोकरीचे मोजे घालतो. जेव्हा मी झोपते, तेव्हा मी तुझे स्वप्नं बघते: जेव्हा तुझी आई गाणं गात असेल तेव्हा तू कसा हसत असेल. बूट घालून छपाक छपाक करायला तुला किती आवडते. तू अंड्यासाठी कोंबड्यांचा कसा शोध घेतो, ब्रॉडी, आता तुझीपण आवडती कोंबडी आहे.



तू जिथं राहतो तिथं तू मच्छरदाणीत झोपतो.
एका राजाच्या मुलासारखं.
डासांच्या गुणगुण पासून सुरक्षित.
तू माझे स्वप्नं बघतो का?
की माझ्या कुत्र्यांचा तू विचार करतो?
की मी वाचून दाखवलेल्या
पुस्तकांबद्दल विचार करतो.
की तुला त्यातले शब्द आठवतात.
जे आपल्यावर चारी बाजूंनी
पांघरुणासारखे पडतात.
तू ती गाणी ऐकतोस का?
जी मी तुला लहानपणी ऐकवली होती?



रोज रात्री मी तीच गाणी गाते. जी मी तुझ्या लहानपणी तुझ्यासाठी गात होती. ज्यामुळे मी तुझी आठवण काढू शकते, या आशेने की तू माझी आठवण काढत असशील. खरंतर मी इथं आहे आणि तू तिथं. माझ्यापासून खूप दूर.



रोज रात्री तू तुझा चांदोबा शोधतो.
रोज रात्री मी माझा चंद्र शोधते.



बघ, तुझा चंद्र
माझा चंद्र पण आहे.

समाप्त